महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२२/ 3784 दिनांक : 05 AUG 2022

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या
अधिनस्त सर्व संस्था.
पुणे विभाग, पुणे.

**विषय : महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा- २०२२ परीक्षा आयोजनाकरिता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करून देण्याबाबत.**

संदर्भ- १. शासन परिपक, सा.प्र.वि.क्र.मलाआ १०१२/प्र.क्र.९५/१२/आठ दि.११.०५.२०१२
२. शासन परिपत्रक, उच्च व तंशिक्षण विभाग, क्रं.संकीर्ण-११११/(प्र.क्र.९)१५/समन्वय, दि.२८ जानेवारी २०१५.
३. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचा दि.०२.०८.२०२२ रोजीचा ईमेल.

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यपध्दत संदर्भिय शासन परिपत्रकाद्वारे विहित करण्यात आली आहे.

आयोगामार्फत शनिवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२२ रोजी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परिक्षा-२०२२ मुंबईसह महाराष्ट्रातील ३७ जिल्हा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. परिक्षेच्या सुरळित आयोजनासाठी करावी लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था तसेच पूर्वतयारी लक्षात घेता शाळा/ महाविद्यालयाची उपलब्धता दिनांक १० ऑगस्ट, २०२२ पर्यंत अंतिम होणे आवश्यक असल्याने **सर्व संस्थांनी आप-आपल्या संस्थेची माहिती सोबत दिलेल्या लिंकद्वरे गुगल फॉर्म मध्ये दि.०८.०८.२०२२ रोजी सायं.०५ वाजे पर्यंत अचूक भरावी.**

तसेच सर्व संस्थांनी (शाळा/ महाविद्यालयांनी ) आयोगाच्या मागणीनुसार शनिवार, दिनांक **०८ ऑक्टोबर २०२२** रोजी आपली संस्था (शाळा/ महाविद्यालय) उपलब्ध करून द्यावी. व आवश्यकता भासल्यास सदर दिवशी संस्थेला स्थानिक सुट्टी जाहीर करावी.

गुगल लिंक- https://forms.gle/kaJZA37TB55q8W3XA
सोबत- संदर्भिय पत्रे.

( डॉ. द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Directorate Of Technical Education
Maharashtra, Mumbai, India

**Technical Education regional office Pune <ropune@dtemaharashtra.gov.in>**

# महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-2022 परीक्षा आयोजनाकरिता शाळा/ महाविद्यालय उपलब्ध करून देण्याबाबत.

**DESK12 Desk Officer** <desk12@dtemaharashtra.gov.in> 2 August 2022 at 12:56
To: romumbai REGIONAL OFFICE <romumbai@dtemaharashtra.gov.in>, Technical Education regional office Pune <ropune@dtemaharashtra.gov.in>, ronashik regional office <ronashik@dtemaharashtra.gov.in>, ronagpur regional office <ronagpur@dtemaharashtra.gov.in>, roaurangabad regional office <roaurangabad@dtemaharashtra.gov.in>, roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>, secretary@mpsc.gov.in

सोबत जोडण्यात आलेल्या पत्रामधील सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

रचना व कार्यपध्दती अधिकारी
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

[Quoted text hidden]

**mpsc 2.8.22.pdf**
41K

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
03 AUG 2022
आवक क्र. 4394

महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.एमजीबी-०३/सीआर-३९/२०२१/तेरा दिनांक : २ ऑगस्ट,२०२२

**अत्यंत तातडीचे/परीक्षा प्राथम्य/कालमर्यादा**

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
तंत्रशिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७
मुंबई-४०००१.

**विषय** :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२२ परीक्षा आयोजनाकरिता शाळा/ महाविद्यालय उपलब्ध करून देण्याबाबत

**संदर्भ** :- (१) शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र. मलोआ १०१२/प्र. क्र.९५/१२/आठ दिनांक ११ मे, २०१२
(२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रं. संकीर्ण-१११९/(प्र.क्र.९)१५/समन्वय, दिनांक २८ जानेवारी, २०१५

महोदय/महोदया,

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यपध्दत संदर्भिय शासन परिपत्रकाव्दारे विहित करण्यात आली आहे. सुलभ संदर्भासाठी सदर शासन परिपत्रकांच्या प्रती सोबत पाठविण्यात येत आहेत.

२.आयोगामार्फत शनिवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परिक्षा-२०२२ मुंबईसह महाराष्ट्रातील ३७ जिल्हाकेंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. प्रस्तुत परीक्षेसाठी साधारणपणे ३,५०,००० उमेदवारांची बैठक व्यवस्था करावी लागणार आहे. तथापि, परीक्षेच्या आयोजनासाठी पुरेशा प्रमाणात शाळा/महाविद्यालये उपलब्ध होत नसल्याचे तसेच काही शाळा/महाविद्यालययाकडून नकार प्राप्त होत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आले आहे. त्यामुळे परीक्षा आयोजनामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. आयोगाच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार सदर परीक्षा आयोजित करणे आवश्यक असल्यामुळे त्यामध्ये कोणताही बदल करता येत नाही. अन्यथा उमेदवारांचा उद्रेक होऊन कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षेच्या सुरळित आयोजनासाठी करावी लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था तसेच पूर्वतयारी लक्षात घेता शाळा/महाविद्यालयांची उपलब्धता दिनांक १० ऑगस्ट, २०२१ पर्यंत अंतिम होणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता सर्व शाळा/महाविद्यालयांना आयोगाच्या मागणीनुसार शनिवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्यासंदर्भात सक्त निर्देश देण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत कृपया आयोगास तात्काळ कळविण्यात यावे.

४. आवश्यकता भासल्यास सदर दिवशी शाळा/महाविद्यालयांना स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात यावी.

५. प्रस्तुत प्रकरण अत्यंत तातडीचे असल्यामुळे यासंदर्भातील जबाबदारी संबंधित शिक्षण निरीक्षक यांच्यावर निश्चित करण्यात यावी. तसेच संबंधित सर्व शिक्षण निरीक्षक यांचा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी कृपया सत्वर उपलब्ध करून देण्यात यावा.

६. यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही; याची कृपया आत्यंतिक दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(सुनिल अवताडे)
सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

२०१२०५१४१३१३२०५२०००१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत
आयोजित परीक्षांकरिता शाळा/
महाविद्यालये उपलब्ध करुन
देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक:मलोआ-१०१२/प्र.क्र. ९५/१२/आठ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ११ मे, २०१२.

संदर्भ- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.८६(१)/२०१२/तीन,
दिनांक-२७/४/२०१२

**शासन परिपत्रक :**

शासन सेवेतील विविध पदांवर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पध्दतीने निवड करण्याकरीता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. भरतीकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शक्यतो सुट्टीच्या दिवशी परीक्षांचे आयोजन केले जाते. उमेदवारांच्या अंदाजित संख्येनुसार जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिका-यांना कळविले जाते. जिल्हाधिकारी कार्यालयाला बहुतांशी शाळा/महाविद्यालयाकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही. वारंवार त्यांच्याशी पत्रव्यवहार करावा लागतो आणि अनेक वेळा त्यांच्याकडून ऐनवेळी शाळा/ महाविद्यालय उपलब्ध करुन देण्यास नकार दिला जातो. परिणामी शाळा/महाविद्यालयांच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षा हया लोकसेवेसाठी आयोजित केल्या जातात. त्यामुळे या परीक्षांच्या आयोजनासाठी जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करुन अथवा अन्य अधिनियमातील तरतूदींचा वापर करुन त्यांच्या जिल्हयातील संबंधीत शाळा/महाविद्यालय परीक्षांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही कृपया करावी.

३. तसेच आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सुचना शालेय शिक्षण विभाग आणि उच्च

व तंत्र शिक्षण विभाग यांनी संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण /उच्चशिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्या मार्फत कृपया द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( श्री. प्र. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित
परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध
करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१११९/(प्र.क्र.९/१५)/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २८ जानेवारी, २०१५.

वाचा :-

१. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.मलोआ-१०१२/ प्र.क्र.९५/१२/आठ, दि.११.५.२०१२.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र (१) क्र.८६(१)/२०१२/तीन, दि.९.७.२०१४ व (२) क्र.८६(१)/२०१५/तीन, दि.३.१२.२०१४.

**शासन परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासनाच्या संबंधीत विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परिक्षांचे आयोजन केले जाते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली जाते व बहुतांशी शाळा/ महाविद्यालयांकडून नकार दिला जातो. परिणामी शाळा/ महाविद्यालयाच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो. ही बाब विचारात घेऊन आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामार्फत कृपया द्याव्यात, अशा सूचना संदर्भाधिन शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे निदेश /सूचना संचालक, तंत्र शिक्षण /उच्च शिक्षण /व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी सर्व संबंधितांना द्यावेत. तसेच संचालक, तंत्र शिक्षण /उच्च शिक्षण/ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन न देणा-या संस्थांविरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१२८१७२३१४६२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2015.01.28 17:32:29 +05'30'

( का.रा.पिळणकर )
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई- ४०० ०२१.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, प्रशिक्षण , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सामान्य प्रशासन विभाग ( का-८ ), मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती (समन्वय).